# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.12.2025** **वार- सोमवार**

---

**महापालिका उमेदवारी**

राज्यात महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. त्यामुळे सर्वच ठिकाणी राजकीय घडामोडी गतिमान झाल्या आहेत. युती– आघाडी बाबतची राजकीय गणितं जुळवण्यात राजकीय पक्षांचे नेते गुंतले आहेत. काही ठिकाणी अजूनही याबाबत स्पष्टता नंही. पुणे महापालिकेची निवडणूक भाजपा, शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया महायुती म्हणून लढवत असून मित्र पक्षांना सन्मानजनक जागा देण्यात येतील भाजपाचे गणेश बिडकर यांनी आज पत्रकारांशी बोलताना सांगितलं. तर तिकडे राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक एकत्रित लढवणार असल्याची घोषणा आमदार रोहित पवार यांनी केली आहे. काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष पुण्यात एकत्रित निवडणूक लढवणार असल्याचं आज संयुक्त पत्रकार परिषदेत सांगण्यात आलं. या आघाडीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेलाही सामावून घेण्याबाबत विचारविनिमय सुरू असल्याचं यावेळी सांगण्यात आलं.

दरम्यान पुणे महापालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीने शहर निवडणूक प्रमुख गणेश बिडकर यांना प्रभाग क्रमांक 24 ड मधून उमेदवारी दिली आहे. बिडकर यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.  भाजपच्या अन्य उमेदवारांमध्ये शनिवार पेठ महात्मा फुले मंडई प्रभागातून स्वरदा बापट,

कुणाल टिळक, बापू मानकर आणि स्वप्नाली पंडित यांचा समावेश आहे. विशाल धनावडे, किरण दगडे, दिलीप वेडे पाटील, मंजुश्री खर्डेकर, श्रीकांत जगताप, मंजुषा नागपुरे, पृथ्वीराज सुतार, हर्षाली माथवड, सचिन दोडके, सायली वांजळे, रोहिणी चिमटे, अमोल बालवडकर आदी माजी नगरसेवकांची उमेदवारीही भाजपानं कायम ठेवली आहे. पक्षाने उमेदवारी दिल्यानंतर उमेदवारांनी एबी फॉर्मसह अर्ज भरण्यास सुरुवात केली आहे.

**<u>आंदोलन</u>**

भारतीय जनता पक्षाने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या कार्यकर्त्यांना डावलून पक्षाशी संबंधित नसलेल्यांना तिकीट दिल्याचा आरोप करत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने आज भाजपच्या पुणे शहर कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आलं. यंदाच्या निवडणुकीत आरपीआयला सहा जागांवर उमेदवारी देण्यात आली आहे.

**<u>प्रचार</u>**

विविध प्रभागतील उमेदवारांची नावं निश्चित होत असतानाच भारतीय जनता पक्षानं प्रचारासाठीही तयारी सुरू केली आहे. भाजपाच्या डिजिटल प्रचार रथांचं उद्घाटन एरंडवणे इथल्या शहर कार्यालयासमोर आज करण्यात आलं. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील, शहराध्यक्ष धीरज घाटे, निवडणूक प्रमुख गणेश बिडकर यावेळी उपस्थित होते.

**<u>पुणेपोलिस</u>**

नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी नियमांचं पालन न करणाऱ्या वाहन चालकांविरुद्धची मोहीम कडक केली आहे. गेल्या चार दिवसांत पोलिसांनी शहराच्या विविध भागांमध्ये नाकाबंदी करून

वाहनांची तपासणी केली. यामध्ये मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या 242 वाहन चालकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

**<u>विजयस्तंभ</u>**

कोरेगाव भीमा इथल्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याला दोनच दिवस शिल्लक राहिले असून प्रशासनाकडून या सोहळ्याची तयारी सुरू आहे. फुलांची सजावट, मदत कक्ष, माध्यमांसाठी कक्ष, उभारण्यात येत आहेत. तसंच वाहनतळ, पीएमपीएमएल साठी थांबेही तयार करण्यात आले आहेत. लोणीकंद पोलिसांनी विजयस्तंभ परिसरात कायमस्वरुपी २५ सीसीटीव्ही कार्यान्वित केले आहेत. हा सोहळा शांततेत पार पाडण्यासाठी आवश्यक ती काळजी घेण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाने विविध यंत्रणांना केल्या आहेत.

**<u>पुरस्कार</u>**

अनाथांची माय अशी ओळख असलेल्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणाऱ्या, माई परिवाराच्या वतीनं दिले जाणारे यशोदा माई राष्ट्रीय पुरस्कार आज जाहीर करण्यात आले. ज्येष्ठ लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावस्कर आणि बुलडाणा इथंल्या सेवासंकल्प प्रतिष्ठानला हा पुरस्कार जाहीर झाला आहे. ममता सिंधुताई सपकाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे याबाबतची घोषणा केली आहे. येत्या ४ जानेवारी रोजी पुण्यात हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

**<u>चित्रपटमहोत्सव</u>**

आठव्या अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची सांगता काल पुण्यात सांगता झाली. अभिनेते मकरंद अनासपुरे यांना यावेळी निळू फुले कलाकार कार्यकर्ता पुरस्कारानं सन्मानित करण्यात

आलं. द फर्स्ट या लघुपटाला उत्कृष्ट लघुपटाचा मान मिळालं. तर ब्रीदिंग ब्ल्यू उत्कृष्ट माहितीपट ठरला. गणेश शेलार यांना उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून सन्मानित करण्यात आलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज 9 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. उद्याही किमान तापमान साधारण असंच राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**